**प्रेस नोट** दि. २१.०५.२०२४

| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बुलडाणा |
|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | आलोसे श्री.पंजाबराव भगवान जाधव,वय ४९ वर्ष,पद—तलाठी,साझा पातुर्डा खुर्द रा.काळेगाव पोस्ट कुंभारझरी ता.जाफ्राबाद जि.जालना ह.मु.अयोध्या नगर,शेगाव ता.शेगाव जि.बुलढाणा |
| लाच मागणी | ८०००/— रुपये |
| लाच स्विकारली | निरंक |
| घटनास्थळ | वाटीका चौक,गौलखेडरोड शेगांव ता. शेगाव जि. बुलढाणा |
| घटना तारीख | १३.०३.२०२४ |

**थोडक्यात हकीकत** :—यातील तक्रारदार यांनी मौजे आस्वंद येथील शेत जमीन तक्रारदार यांचा आतेभाऊ यांचे नावे खरेदी केली असुन सदर खरेदीनंतर शेतीचा फेरफार घेवुन सातबारा उताऱ्यावर तक्रारदार यांचे आतेभावाचे नाव घेण्यासाठी व खरेदीसाठी मोबदला म्हणुन श्री.जाधव,तलाठी पातुर्डा खुर्द हे १०,०००/— रुपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बुलडाणा घटकाकडे प्राप्त झाली होती.

त्यानुसार दिनांक १३.०३.२०२४ रोजी लाचमागणी पडताळणी कार्यवाही आयोजीत केली असता, लोकसेवक श्री.जाधव तलाठी पातुर्डा ता. संग्रामपुर जि. बुलढाणा तक्रारदार यांचेकडे ८०००/—रुपये लाच मागणी करुन सदर लाच रक्कम तात्काळ घेवुन येण्यास सांगीतले. परंतु आरोपी यांना तक्रारदार यांचेवर संशय आल्याने त्यांनी लाच रक्कम स्विकारली नाही. त्यावरुन आरोपी यांना ताब्यात घेवुन त्यांचेविरुद्ध लाच मागणीबाबत पोलीस स्टेशन शेगांव शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे दिनांक २१.०५.२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**सदर कार्यवाही :—**

१.मा.श्री.मारुती जगताप,पोलीस अधिक्षक,अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, परिक्षेत्र अमरावती

२.मा.श्री.अनिल पवार,अप्पर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो,अमरावती,परिक्षेत्र अमरावती

३.श्रीमती शितल घोगरे,पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी तसेच तपास अधिकारी पोलीस निरीक्षक सचिन इंगळे, सापळा मदत पथक श्री.सफौ/श्याम भांगे, पोहेकॉ/प्रविण बैरागी, पोना/जगदीश पवार, पोना/विनोद लोखंडे, पोकॉ रंजित व्यवहारे, चानापोकॉ/नितीन शेटे, चालक पोकॉ/अर्शद शेख अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा. कार्यालय दुरध्वनी कमांक ०७२६२—२४२५४८ व ९६५७०६६४५५ तसेच टोल फ्रि कमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक,अॅन्टी करप्शन ब्युरो,बुलडाणा यांनी केले आहे.

(श्रीमती शितल घोगरे)
पोलीस उपअधिक्षक,
अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा

Scanned with CamScanner